MHST090009792013

**<u>नि.दि.दा.क्र. २१३/२०१३ मधील निशाणी क्र. १६३ वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र.१ ने प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. ९६ व ९८ वरील खर्चाची रक्कम वादींनी स्विकारण्याचा हुकूम व्हावा व त्यांची कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांची कैफियत स्विकारण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज व नि.क्र. १६९ ला असलेले म्हणणे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, त्याने नि.क्र.९६ व ९८ वर अर्ज करुन कैफियत व ताकीद अर्ज दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन मागितला होता. सदरचे दोन्ही अर्ज र.रु.१५००/– च्या खर्चाच्या रक्कमेवर मा. न्यायालयाने मंजूर केले आहेत. परंतु, सदरची रक्कम वादी अथवा त्यांचे वकील यांना दिली या गैरसमजुतीखाली त्याने खर्चाची रक्कम भरली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी विरुद्ध खर्चाची रक्कम न भरणा केल्याने त्याच्याविरुद्ध विना कैफियत आदेश पारित झाला. प्रस्तुतकामी मे. कोर्टाच्या हुकूमाचा अवमान करुन वादींना खर्चाची रक्कम दयायची नाही असा हेतु प्रस्तुत प्रतिवादीचा केव्हाही नव्हता व नाही. त्यामुळे, त्याने सदरचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादींनी सदर अर्जावर म्हणणे देवून अर्जातील कथने त्यांना मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, याकामी प्रतिवादीने त्याची

कैफियत व म्हणणे दाखल न केलेने त्याचेविरुद्ध ता. २३/०४/२०१४ रोजी मे. कोर्टाने विना कैफियत व विना म्हणणे आदेश पारीत केला. त्यानंतर प्रतिवादीने ता.१६/३/२०१६ रोजी नि.क्र. ९६ व ९८ नुसार कैफियत देणेस झालेला उशीर माफ होणेसाठी व कैफियत स्विकारणेबाबत अर्ज दाखल केलेला होता. सदरचा अर्ज ता. १७/०४/२०१७ रोजी रक्कम रु. १५००/– दंड भरणेच्या अटीवर मंजुर केला होता. सदर आदेशानुसार प्रतिवादीने पुर्तता न केलेने ता. २०/०२/२०१९ रोजी पुन्हा नि. नं. १ वर खर्चाची रक्कम न भरलेबाबत व विना कैफियत आदेश पारीत केलेला आहे. त्यानंतर प्रतिवादीने आजअखेर ता. २०/०२/२०१९ रोजीचा आदेश रद्द करुन घेतलेला नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीने दाखल केलेला नि. नं. १६३ चा दंड भरणेस झालेल्या विलंब माफीचा अर्ज स्विकारणेबाबतचा अर्ज कायद्याने मेंटेनेबल नाही. याकामी मे. कोर्टाने प्रतिवादी याचेविरुद्ध पुन्हा विना कैफियत आदेश केला असलेने नि. नं. ९६ व ९८ वरील आदेश संपुष्टात आलेले आहेत. प्रतिवादीने दिलेला नि. नं. १६३ वरील अर्ज कायद्याने चालु शकत नाही. प्रतिवादीने विना कैफियतचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी अर्ज देणे कायद्याने अपेक्षीत असलेने सदरचा अर्ज या स्टेजला चालु शकत नसलेने खर्चासह फेटाळणेस पात्र आहे.

५. प्रतिवादीची वर्तणूक पाहता प्रस्तुत प्रतिवादी यास दाव्याचे कामी कोणत्याही प्रकारे गांभीर्य नसलेचे दिसते. प्रतिवादीने नि. नं. १५० ला तुर्तातुर्त ताकीद अर्ज देवून तो देखील प्रलंबित ठेवण्याची त्यांची मानसिकता दिसुन येते. प्रतिवादी यास केवळ दाव्याचे काम लांबविण्यातच स्वारस्य आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी हा मे. कोर्टाची कोणत्याही प्रकारची व कसलीही सहानुभुती मिळणेस पात्र नाही. सबब, प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालु

शकत नसलेने खर्चासह फेटाळणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

६. प्रस्तुत अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले असता प्रतिवादीने नि.क्र.९६ वरील अर्जावरील रक्कम भरली नसल्याचे दिसते. त्यामुळे त्याला कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदरचे प्रकरण हे १० वर्षांहून जुने आहे. प्रतिवादीस कैफियत व खर्चाची रक्कम देण्यास जवळपास ७ वर्षांचा विलंब झालेला आहे असे असे दिसून येते. प्रतिवादीच्या गैरसमजुतीमुळे दाव्यात विलंब झालेला आहे. त्यामुळे इतक्या जुन्या प्रकरणामध्ये प्रतिवादीची ही वर्तणूक योग्य नाही. सबब, प्रस्तूतचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ने पुढील तारखेपर्यंत रक्कम रुपये १५००/– वादीला दयावे.

३. वर नमूद खर्चाची रक्कम जमा केल्यानंतर वादींनी प्रतिवादी क्र.१ कडून नि.क्र. ९६ वरील आदेशातील खर्चाची रक्कम स्विकारण्याचा आदेश पारित करण्यात येतो.

४. वरील पुर्तता केल्यानंतर प्रतिवादीची कैफियत स्विकारण्यात येते.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2024.09.19 12:33:41 +0530

स्थळ : कोरेगाव ( ए.ए.पाचरणे )

दिनांक : १०/०९/२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.